**प्रेसनोट** **दि.१५/०५/२०१९**

## दत्तवाडी पोलीस स्टेशन, पुणे शहर.

## “आत्महत्या करण्यास निघालेल्या इसमास पोलीसांनी वेळीच दखल घेऊन वाचविले”

“मी घरात लटकुन घेतो आहे, तु घरी येई पर्यंत माझे मढे तुला मिळेल” हे वाक्य आहे पर्वती मध्ये राहणाऱ्या एका ३७ वर्षीय युवकाचे. त्याने दारुच्या नशेत आपल्या बायकोला फोन करुन हा निरोप दिला आणि त्या महिलेच्या पायाखालची जमीन एक सेकंदात हालवुन गेली.

दिनांक १४ मे २०१९ रोजी दत्तवाडी पोलीस स्टेशनचे पोलीस कॉन्स्टेबल विष्णु सुतार, अनिल लांडे हे पर्वतीदर्शन भागात सायंकाळी ०५ वाजण्याच्या सुमारास बिट मार्शल ड्युटी करत होते. त्यावेळेस त्यांना पोलीस कंट्रोल रुम कडुन एक मॅसेज मिळाला कि, पर्वती दर्शन मध्ये एक इसम गळफास लावुन घेत आहे असे स्थानिक नागरिकांनी कळविले आहे. आपण तातडीने तेथे जाऊन त्याला वाचवा असा मॅसेज मिळताच बिट मार्शल कर्मचारी यांनी दिलेल्या पत्यावर जाऊन पाहिले असता एका घराचा दरवाजा आतुन बंद केलेला होता. त्या घराच्या खिडकीतुन पाहिले असता एका युवकाने घराच्या छताला ओढणीने स्वतःला लटकवुन घेतले होते. त्याचे पाय हालताना दिसत होते त्याला वाचविण्यासाठी पोलीसांनी दरवाजा तोडला व त्याला उचलुन बाहेर आणले तो व्यक्ती बेशुध्द असल्याने त्याला सर्वात प्रथम हरजीवन हॉस्पीटल व त्यानंतर पुना हॉस्पीटल मध्ये उपचार कामी दाखल केले.

काही वेळाने ज्या महिलेने पोलीस नियंत्रण कक्ष पुणे येथे फोन करुन माहिती कळविली होती त्या महीलेने सांगितले कि, त्यांचे पती वय ३७ हे अति दारुच्या नशेत घरात असताना त्यांनी असा फोन आपल्या पत्नीला त्या बाहेर गेल्या असताना केला होता. त्यांचे मानसिक संतुलन ढळले कि,त्यांच्या मनात असे स्वतःचे जीवन संपविण्याचा विचार येत असल्याने ते खरच काही विपरीत करुन घेतील या चिंतेमधुन त्यांनी पोलीसांना हि माहिती कळविली.

एक युवक आत्महत्या करतो आहे त्याचा जीव वाचला पाहिजे या भावनेतुन दत्तवाडी पोलीस स्टेशनचे बिट मार्शलवरील पोलीस कॉन्स्टेबल विष्णु सुतार व अनिल लांडे यांनी अत्यंत जलद गतीने हालचाली करुन सहायक पोलीस निरीक्षक संजय चव्हाण, पोलीस हवालदार अशोक हिरवाळे, नितीन केरीपाळे यांच्या मदतीने युवकाचा जीव वाचविला

(देविदास घेवारे)
वरिष्ठ पोलीसनिरीक्षक
दत्तवाडी पोलीस स्टेशनपुणे शहर